| MHSN110005632022 | नियमित दिवाणी दावा क्र.१५२/२०२२<br>किशोर सपाटे / दिलीप सपाटे |
|---|---|

## <u>निशाणी १३ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ ते ४ यांच्यामार्फत त्यांची कैफियत मुदतीत दाखल न झाल्यामुळे त्यांच्या विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द होवून मिळण्यासाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, दाव्याचे समन्स प्राप्त झाल्यानंतर प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी वकीलांशी संपर्क साधून कागदपत्रे दाखवली. परंतु सदर प्रतिवादी हे अल्पशिक्षित अडाणी असल्यामुळे व ग्रामीण भागातील राहणारे असल्यामुळे सदर दाव्यास कैफियत न देता त्यांनी वकीलांच्या सांगण्यावरुन दुसराचा दावा दाखल केला. त्यामुळे, कैफियत देण्यास विलंब झालेला आहे. प्रतिवादी जाणूनबुजून गैरहजर राहिलेले नाहीत. प्रतिवादी यांनी जाणूनबुजून विलंब केलेला नाही. त्यामुळे, त्यांची कैफियत दाखल करुन न घेतल्यास त्यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, न्यायाच्या दृष्टीने त्यांची कैफियत दाखल करुन घेण्याची त्यांनी विनंती केली आहे.

२. वादी यांना बरीच संधी देवून देखील त्यांनी प्रस्तुत अर्जाला म्हणणे दिलेले नाही. त्यामुळे, सदर अर्जाचे सुनावणी वादी यांच्या म्हणण्याविना करण्यात आलेली आहे.

३. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. उभय पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा हा वाटपाकरीता दाखल केलेला

आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक २२/०८/२०२४ रोजी दाखल केलेला आहे. त्यांनी ३० दिवसात आणि तद्नंतर जास्तीत जास्त ९० दिवसामध्ये कैफियत व म्हणणे सादर करणे गरजेचे होते. परंतु मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या न्यायनिवाड्यामध्ये सदर ९० दिवसांचा कालावधी हा निर्देशक स्वरुपाचा असल्यामुळे पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्यासाठी नैसर्गिक न्यायतत्वानुसार त्यांना संधी देणे गरजेचे असल्याबाबत नमूद केले आहे. त्यामुळे, अर्ज मंजूर न केल्यास विनाकारण गुंतागुंत होवून प्रकरणांची संख्या वाढणार आहे. सबब, प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडायला देणे या दाव्याच्या सुनावणीकरीता गरजेचे असल्यामुळे त्यांच्याविरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्दबातल करणे मला न्यायोचित वाटते. त्यामुळे, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी दिलेली कैफियत सदर कामी वाचण्यात येते.

ASHWINI JOTIRAM BACHULKAR

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2025.06.18 17:44:53 +0530

आटपाडी. (अ. जो. बाचुळकर)

दिनांक : १८/०६/२०२५ दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

आटपाडी

*****

## CERTIFICATE

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mr. Ketan Ashok Sargar, (Grade-III) |
| Court | : | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Atpadi |
| Date | : | 18/06/2025 |
| Order signed by the Presiding Officer | : | 18/06/2025 |
| Order uploaded on | : | 18/06/2025 |